# शौर्य मराठी
महाराष्ट्राचे निडर दैनिक
RNI-MAHMAR/2023/89125
epaper.shauryamarathi.com
जळगाव, धुळे, नंदुरबार | शुक्रवार, दि. १६ जानेवारी २०२६ | वर्ष २ रे | अंक ६८ किंमत : ५ रु. | पाने ४


## दिन विशेष...

१६८१ : संभाजीराजेंचा छत्रपती म्हणून राज्याभिषेक झाला.
१९०१ : सुप्रसिध्द अर्थशास्त्रज्ञ व न्यायमूर्ती महादेव रानडे यांचे निधन झाले.
१९३८ : बंगाली कादंबरीकार शरदचंद्र चटर्जी यांचे निधन झाले.
१९४१ : नेताजी सुभाषचंद्रांचे देशाबाहेर प्रयाण झाले.

| | | |
|---|---|---|
| सेन्सेक्स | ८३,३८२.७१ | -२४४.९८(०.२९%) |
| डॉलर | ₹ ९०.३६ | |

**आजचे तापमान** (डिग्री सेल्सिअस)

| | कमाल | किमान |
|---|---|---|
| जळगाव | ३१ | १४ |
| दिल्ली | १९ | ०६ |
| मुंबई | ३३ | १७ |
| नागपूर | २९ | १२ |
| पुणे | ३१ | १० |

## सुविचार

संकटं तुमच्या संयमाची परीक्षा घेतात, पण त्यातूनच यश मिळतं

सुर्योदय - सुर्यास्त
स.-७:०७ संध्या-६:०७

## सोने - चांदी

सोने(१० ग्रॅम) - चांदी (प्रति किलो)
१,४५,८००/- २,९५,०००/-

## केळी भाव

नवती : ७५१ ते ७७०
पिल बाग : २५१ ते २७०
कांदे बाग : ----

# भाजप-शिंदे सेनेला भरघोस मतं
# मुंबईत ठाकरेंच्या सत्तेला मोठा सुरुंग

## विविध संस्थांनी केलेल्या सर्वेक्षणाचे एक्झिट पोलचे आकडे आले समोर

वृत्तसंस्था । मुंबई

**राज्यभरात २९ महापालिका निवडणुकांसाठी आज मतदान प्रक्रिया पार पडली. गेल्या महिन्याभरापासून महापालिका निवडणुकीची रणधुमाळी सुरु होती. अखेर आज सर्व उमेदवारांचे भविष्य मतपेटीत कैद झालं आहे. महाराष्ट्रात मुंबई, पुणे, नाशिक, ठाणे, नागपूर, छत्रपती संभाजीनगर या महापालिकेकडे सर्वांचं लक्ष लागलं आहे. सर्व २९ महापालिकांच्या निवडणुकांचा निकाल उद्या समोर येईल. कारण उद्या मतमोजणी पार पडणार आहे. पण त्याआधी विविध संस्थांनी केलेल्या सर्वेक्षणाचे एक्झिट पोलचे आकडे समोर आले आहेत. एक्सिस माय इंडियाच्या एक्झिट पोलची आकडेवारी समोर आली आहे.**

एक्सिस माय इंडियाच्या अंदाजानुसार, मुंबई महापालिका निवडणुकीत भाजपप्रणित महायुतीला १३१ ते १५१ जागा मिळण्याचा अंदाज आहे.



याचाच अर्थ भाजप आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेला मुंबईत बहुमत मिळणार असल्याचा अंदाज वर्तवण्यात आला आहे. दुसरीकडे शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे आणि मनसे पक्षांच्या युतीला ५८ ते ६८ जागांवर समाधान मानावं लागू शकतं, असा अंदाज वर्तवण्यात आला आहे.

याचाच अर्थ उद्धव ठाकरेंच्या मुंबई महापालिकेतील सत्तेला इथे सुरुंग लागण्याची शक्यता आहे.

### ➢ दोन्ही ठाकरे बंधूंसाठी हा मोठा धक्का

**एक्सिस माय इंडियाच्या एक्झिट पोलनुसार, मुंबईत काँग्रेस आणि वंचित बहुजन आघाडीला १२ ते १६ जागांवर यश मिळणार असल्याचा अंदाज आहे. तर, मुंबईत अपक्ष आणि इतरांचे ६ ते १२ जागा जिंकून येण्याची शक्यता आहे. एक्झिट पोलच्या अंदाजानुसार, मुंबईत भाजपच्या महायुतीला ४२ टक्के मतं मिळणार असल्याचा अंदाज आहे. तर ठाकरेंच्या युतीला ३२ टक्के मते मिळण्याची शक्यता वर्तवण्यात आली आहे. त्यामुळे ठाकरे बंधूंना हा मोठा धक्का मानला जात आहे. तर काँग्रेसला १३ टक्के मते मिळण्याची शक्यता आहे.**

## कर्तव्यात कसूर करणाऱ्या १५५ कर्मचाऱ्यांवर गुन्हा



वृत्तसंस्था । मुंबई

**निवडणूक ड्युटीला दांडी मारणाऱ्या आणि वारंवार सूचना देऊनही गैरहजर राहणाऱ्या १५५ शासकीय कर्मचाऱ्यांवर प्रशासनाने कठोर कारवाई केली आहे. या सर्व कर्मचाऱ्यांविरुद्ध सिटीचौक पोलीस ठाण्यात गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. मनपा सहाय्यक आयुक्त उदय मानवतकर यांच्या तक्रारीवरून ही कारवाई झाली. प्रत्यक्ष मतदानाच्या दिवशी आणि निवडणूक साहित्य वाटपावेळी हे कर्मचारी अनुपस्थित होते. राष्ट्रीय कर्तव्यात हलगर्जीपणा केल्याचा ठपका ठेवत, लोक प्रतिनिधित्व अधिनियम १९५१ च्या कलम १३४ नुसार त्यांच्यावर गुन्हा नोंदवण्यात आला आहे. या धडक कारवाईमुळे विनाकारण गैरहजर राहणाऱ्या कर्मचाऱ्यांचे धाबे दणाणले आहेत.**

## थोडक्यात

### बांगलादेशच्या क्रिकेटमध्ये मोठा भूकंप

**नवी दिल्ली ।** बांगलादेशमधील क्रिकेटमध्ये आता मोठा भूकंप आला आहे आणि त्याचा मोठा धक्का त्यांच्या क्रिकेट संघटनेला बसला आहे. कारण बांगलादेशच्या क्रिकेटपटूंनी आता संप पुकारला आहे. पण फक्त तेवढ्यावर ते थांबलेले नाहीत तर त्यांनी बांगलादेशमधली स्पर्धाच बंद पाडली आहे. पण हे सर्व का आणि कसं घडलं, याची माहिती आता समोर आली आहे.

### शेअर बाजार का बंद?! अब्जाधीश संतापले

**मुंबई ।** झेरोधाचे सह-संस्थापक आणि अब्जाधीश नितीन कामथ यांनी गुरुवारी शेअर बाजार बंद ठेवल्यामुळे नाराजी व्यक्त केली आहे. , त्यांनी याविषयी बोलताना, महाराष्ट्रातील महानगरपालिका निवडणुकीसाठी शेअर बाजार बंद करणे चुकीचे आहे आणि स्थानिक निवडणुकीमुळे व्यापार थांबवणे भारतासारख्या वेगाने वाढणाऱ्या जागतिक बाजारपेठेसाठी चांगला संदेश देत नाही. असे म्हटले आहे.

# धुळ्यात मतदानादरम्यान राडा; थेट ईव्हीएमची तोडफोड

## भाजप उमेदवारांवर गंभीर आरोप

प्रतिनिधी । धुळे

**महाराष्ट्रातील २९ महानगरपालिकांच्या मतदानाचा उत्साह आज १५ जानेवारी रोजी शिगेला पोहोचला आहे. मात्र, धुळे महानगरपालिका निवडणुकीच्या मतदानादरम्यान प्रभाग क्रमांक १८ मध्ये एक धक्कादायक प्रकार समोर आला आहे. येथे मतदान सुरू असतानाच ईव्हीएम मशीनची थेट तोडफोड करण्यात आल्याने संपूर्ण परिसरात एकच खळबळ उडाली आणि मतदान केंद्रावर तणावाचे वातावरण निर्माण झाले.**



या तोडफोडीच्या घटनेनंतर शिवसेना उमेदवार सतीश महाले यांनी आक्रमक पवित्रा घेतला आहे. महाले यांनी थेट भाजप उमेदवारांवर ईव्हीएम मशीन फोडल्याचा गंभीर आरोप केला आहे. 'भाजप उमेदवारांनी आणि त्यांच्या कार्यकर्त्यांनी मतदान केंद्रावर केवळ यंत्रांची तोडफोडच केली नाही, तर सर्वसामान्य मतदारांमध्ये दहशत माजवण्यासाठी दादागिरी केली', असा दावा महाले यांनी केला. या गोंधळामुळे मतदान प्रक्रियेत मोठा व्यत्यय आला असून, मतदारांमध्ये भीतीचे सावट पसरले आहे. दरम्यान, या घटनेमुळे महायुतीमधील अंतर्गत कलह आणि सत्तासंघर्ष चव्हाट्यावर आला आहे.

**२०१७ ची समीकरणे आणि सत्तेची गणिते**

धुळे महानगरपालिकेच्या राजकीय इतिहासावर नजर टाकल्यास २०१७ मध्ये ७४ जागांसाठी झालेल्या निवडणुकीत भाजपचे स्पष्ट वर्चस्व होते. त्यावेळी भाजपने ५८ जागा जिंकून एकहाती सत्ता मिळवली होती. मात्र, यंदाची निवडणूक अत्यंत चुरशीची ठरत आहे. शिवसेनाकडे २९, राष्ट्रवादी (शरद पवार) गटाकडे १९, तर काँग्रेस आणि कडे प्रत्येकी २१ जागांचे बळ मागील काळात दिसून आले आहे. वंचीत, सपा आणि मनसेची ताकदही निर्णायक ठरू शकते. सध्या घटनास्थळी मोठा पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे. पोलीस चौकशी सुरू आहे. तोडफोड झालेल्या मतदान केंद्रावर पुनर्मतदान होणार की नाही आणि दोषींवर काय कारवाई होणार, (पान २ वर)

## अकोल्यात शिवसेना-भाजप उमेदवारात बाचाबाची

वृत्तसंस्था । अकोला



**अकोला महापालिका निवडणुकीसाठी आज मतदान प्रक्रिया सुरू असतानाच भाजप आणि शिवसेनेच्या उमेदवारांमध्ये शाब्दिक बाचाबाची झाल्याचं पाहायला मिळालं.**

अकोला महापालिकेतील प्रभाग क्रमांक-१७ मधील भाजप उमेदवार करण साहू आणि शिवसेना शिंदे गटाचे उमेदवार राजेश मिश्रा यांच्यात शाब्दिक बाचाबाची झाली, यामुळे कार्यकर्ते भडकल्याने मतदान केंद्रावर चांगलाच गोधळ उडाला होता. मात्र पोलिसांनी वेळीच हस्तक्षेप केल्याने वाद शांत झाला.

अकोल्यातील जुना शहर भागातील प्रभाग क्रमांक १७ मधील श्री शिवाजी विद्यालय येथे भाजप उमेदवार करण शाहू आणि शिवसेना एकनाथ शिंदे पक्षाचे उमेदवार राजेश मिश्रा यांच्यामध्ये (पान २ वर)

## नाशकात मतदानाच्या पूर्वसंध्येला कुठे पाचशे, तर कुठे पाच हजारांपर्यंत फुटला भाव

वृत्तसंस्था । नाशिक

**नाशिक महापालिकेच्या ३१ प्रभागांतील १२२ जागांसाठी गुरुवारी (दि. १५) मतदान होत आहे. भाजप स्वबळावर. तर शिंदे सेना आणि राष्ट्रवादीने युती करीत भाजपसमोर यंदा आव्हान उभे केले आहे.**




प्रचाराचा टप्पा ओलांडल्यानंतर आता लक्ष्मीदर्शनाचे प्रयोग जोरात सुरू आहेत. उमेदवारांनी तीळगूळ घ्या, गोड बोला या परंपरेचा फायदा घेऊन घराघरांत जाऊन मतदारांना संक्रांतीच्या शुभेच्छा दिल्या आणि प्रचाराची संधी साधली. ज्यात महिला उमेदवारांनी वाणाच्या निमित्ताने तर पुरुष उमेदवारांनी तीळगुळाच्या भेटवस्तू देऊन मतदारांशी थेट संवाद साधला.

प्रभागांमध्ये पैसेवाटप सुरू असल्यामुळे प्रतिस्पर्धी उमेदवारांच्या कार्यकर्त्यांकडून अडथळे आणले जात असून, काही ठिकाणी वादाचे प्रसंगही घडत आहेत. काही उमेदवार मात्र थेट म्हणत आहेत, (पान २ वर)

## छ.संभाजीनगर महापालिका निवडणुकीत ७०० बोगस मतदार पकडल्याचा दावा; मुकुंदवाडीत राजकीय पक्षांचा राडा

वृत्तसंस्था । छ.संभाजीनगर

**राज्यभरातील २९ महापालिकांच्या निवडणुकीचा धुरळा उडाला असतानाच, छत्रपती संभाजीनगरमध्ये एकाच वेळी ७०० बोगस मतदार पकडल्याचा खळबळजनक दावा राजकीय पक्षांनी केला आहे. विशेष म्हणजे, या मुद्द्यावर विरोधी पक्षातील शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) व काँग्रेससोबतच सत्ताधारी राष्ट्रवादी काँग्रेसनेही (अजित पवार गट) आक्रमक पवित्रा घेतल्याने प्रशासनाची धावपळ उडाली आहे.**



शहरातील मुकुंदवाडी परिसरातील 'ए-वन' हॉटेल आणि राजर्षी शाहू शाळेच्या परिसरात असलेल्या मतदान केंद्रावर हा प्रकार घडल्याचे समोर आले आहे. राजकीय कार्यकर्त्यांच्या दाव्यानुसार, सकाळी ११ वाजेच्या सुमारास मोठ्या संख्येने संशयास्पद व्यक्ती मतदानासाठी आल्या होत्या.

बोगस मतदानाचा संशय येताच ठाकरे गट, काँग्रेस आणि राष्ट्रवादीच्या कार्यकर्त्यांनी त्यांना अडवण्याचा प्रयत्न केला. यावरून कार्यकर्ते आणि पोलिसांमध्ये तीव्र शाब्दिक चकमक उडाली. ठाकरे गटाने पोलीस आणि सरकारविरोधात जोरदार घोषणाबाजी करत परिसर दणाणून सोडला. या घटनेमुळे मतदान केंद्रावर (पान २ वर)

## जामिनासाठी मागितली दोन लाखांची लाच

### नाशिकमधील दोन 'पीएसआय'वर गुन्हा दाखल

वृत्तसंस्था । नाशिक

मुंबई नाका पोलिस ठाण्यात दाखल एका फसवणुकीच्या गुन्ह्यातील संशयिताला जामीन मिळविण्यासाठी मदत करण्याकरिता दोन लाखांची लाच घेण्यात आली आहे. त्या प्रकरणी दोन पोलिस उपनिरीक्षकांसह शासकीय विश्रामगृहातील उपाहारगृह चालविणाऱ्या बापलेकाविरुद्ध गुन्हा नोंदविण्यात आला आहे.

लाचलुचपत प्रतिबंधक विभागाचे (एसीबी) उपअधीक्षक एकनाथ पाटील यांनी या संदर्भात फिर्याद दिली आहे. त्यानुसार मुंबई नाका पोलिस ठाण्यात पोलिस उपनिरीक्षक संशयित दत्तात्रेय एकनाथ गोडे (रा. कामटवाडे), उपनिरीक्षक अतुल भुजंगराव क्षीरसागर यांच्यासह शासकीय विश्रामगृहातील उपाहारगृह चालक रमेश गंभीरराव आहिरे (वय ६१) व कल्पेश रमेश आहिरे (२८) यांच्याविरुद्ध गुन्हा नोंद आहे. २०२५ मध्ये तक्रारदाराविरुद्ध मुंबई नाका पोलिसांत फसवणुकीचा गुन्हा नोंद आहे. त्या गुन्ह्यात अटकपूर्व जामीन मिळविण्यासाठी कल्पेश आहिरे याने गोडे याच्या वतीने तक्रारदाराकडे दोन लाखांची मागणी (पान २ वर)

# जळगाव महापालिका निवडणुकीत ५३ टक्के मतदान

## सायंकाळी ४ वाजेनंतर मतदार घराबाहेर पडल्याने केंद्रासमोर लागल्या रांगा

प्रतिनिधी । जळगाव

**जळगाव शहर महानगरपालिकेच्या सार्वत्रिक निवडणुकीसाठी झालेल्या मतदानात दिवसभरातील संथ प्रतिसादानंतर अखेर सायंकाळी चित्र बदलले. सकाळपासून अपेक्षेप्रमाणे मतदान न झाल्याने राजकीय वर्तुळात चिंतेचे वातावरण होते. मात्र दुपारनंतर आणि विशेषतः सायंकाळी ४ वाजेनंतर मोठ्या प्रमाणात मतदार मतदानासाठी घराबाहेर पडल्याने शहरातील अनेक मतदान केंद्रांवर रांगा लागल्या. या शेवटच्या टप्प्यातील उत्स्फूर्त प्रतिसादामुळे मतदानाचा टक्का वाढत अखेर ५३ टक्क्यांपर्यंत पोहोचला.**

सकाळच्या सत्रात मतदानाचा वेग अत्यंत संथ राहिला होता. दुपारी १:३० वाजेपर्यंत केवळ २२.४९ टक्के मतदान झाल्याची नोंद होती. त्यामुळे उमेदवार, पक्ष कार्यकर्ते आणि निरीक्षकांकडून कमी मतदानाबाबत विविध तर्कवितर्क लढवले जात होते. काही प्रभागांमध्ये मतदारांची उपस्थिती अत्यल्प असल्याचे चित्र दिसत होते. यामुळे यावेळी मतदानाचा टक्का कमी राहणार, अशी चर्चा



सुरू झाली होती.

मात्र दुपारी १:३० ते ३:३० या दोन तासांत मतदानाला वेग आला. या कालावधीत तब्बल ११.७८ टक्क्यांची वाढ झाली आणि दुपारी ३:३० वाजेपर्यंत मतदानाचा टक्का ३४.२७ झाला. विशेष म्हणजे, या टप्प्यात महिलांचा सहभाग पुरुषांपेक्षा अधिक राहिला. दोन तासांत मतदान करणाऱ्या ५१,६५८ मतदारांपैकी २६,०६३ महिला तर २५,५९५ पुरुष मतदार होते. यामुळे अनेक प्रभागांमध्ये महिलांनी निर्णायक भूमिका बजावल्याचे चित्र दिसून आले.

सायंकाळी ४ नंतर मात्र मतदान केंद्रांवर अचानक गर्दी वाढली. कार्यालयातून सुटलेला नोकरदार वर्ग, तरुण मतदार तसेच शेवटच्या क्षणी मतदानाचा हक्क बजावण्यासाठी बाहेर पडलेले नागरिक मोठ्या संख्येने मतदानासाठी दाखल झाले. अनेक केंद्रांवर मतदानाची वेळ संपल्यानंतरही रांगेत उभ्या असलेल्या मतदारांना मतदानाची संधी देण्यात आली. त्यामुळे काही केंद्रांवर रात्री उशिरापर्यंत मतदान प्रक्रिया सुरू होती. प्रशासनाकडून संपूर्ण मतदान प्रक्रिया काटेकोर नियोजनात पार पडली. कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी पोलिस बंदोबस्त कडक ठेवण्यात आला होता. कोणताही अनुचित प्रकार (पान २ वर)

## संपादकीय

### आता ग्रामीण कौल

महाराष्ट्रातील नगरपरिषदा आणि नगरपंचायतींच्या निवडणुका गेल्या महिन्यात पार पडल्यानंतर आज राज्यातील २९ महानगरपालिकांसाठी मतदान होत असतानाच निवडणूक आयोगाने राज्यातील जिल्हा परिषदा आणि पंचायत समितीची निवडणूकही जाहीर केली आहे. नगरपरिषदा आणि महानगरपालिका निवडणुकीच्या निमित्ताने राज्यातील शहरी मतदारांचा कौल काय आहे हे समोर येत असतानाच आता ग्रामीण मतदारांच्या मनात काय आहे हे जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या निवडणुकीच्या निमित्ताने समोर येणार आहे. जिल्हा परिषदेचे राजकारण हे मुळातील राजकारण असते आणि कोणत्याही मोठ्या राजकारणाची ती सुरुवात असते, असेच आजपर्यंत अनेक वेळा सिद्ध झाले आहे. जिल्हा परिषदेच्या गटातून किंवा पंचायत समितीच्या गणातून निवडून आलेले अनेक जण पुढे नंतर आमदार म्हणून आपली कारकीर्द गाजवत असतात. ग्रामीण भागामध्ये कार्यकर्त्यांचे मोहोळ तयार करण्यासाठी आणि कार्यकर्त्यांचा पाया वाढवण्यासाठी जिल्हा परिषद आणि पंचायत समितीच्या निवडणुका नेहमीच महत्त्वाच्या ठरतात. गेल्या काही वर्षांमध्ये महाराष्ट्रातील राजकीय घडामोडींनी घेतलेले वळण पाहता या नव्या वळणावरील जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणूक निश्चितच मनोरंजक ठरणार आहे. या राज्यामध्ये दीर्घकाळ ग्रामीण राजकारणामध्ये काँग्रेसचा पगडा होता, अनेक जिल्हा परिषदा आणि पंचायत समित्यांमध्ये दीर्घकाळ काँग्रेसची सत्ता होती. पण गेल्या काही वर्षांमध्ये संपूर्ण समीकरणे बदलून गेली आहेत. राज्यात सत्तेवर असलेल्या महायुतीला ग्रामीण भागामध्येसुद्धा आपले पाय रोवायचे असल्याने जिल्हा परिषद निवडणुकीसाठी सुद्धा त्यांची यंत्रणा जोराने कामाला लागणार आहे यात शंका नाही. महाराष्ट्राच्या राजकारणात ढोबळपणे महायुती विरुद्ध महाआघाडी असे समीकरण असले तरी महानगरपालिका निवडणुकीच्या निमित्ताने हे समीकरण विस्कळीत झाल्याचे दिसून आले आणि जिल्हा परिषद निवडणुकीमध्ये हे समीकरण अधिकच विघटित होईल अशी चिन्हे दिसत आहेत. भारतीय जनता पक्ष हा प्रामुख्याने शहरांमध्ये आणि नगरांमध्ये प्रसिद्ध असलेला पक्ष असल्याची भावना असल्याने ग्रामीण राजकारणामध्ये काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेस यांचाच पगडा असतो. विदर्भातील अपवाद वगळता राज्याच्या इतर भागांमध्ये भारतीय जनता पक्षाला ग्रामीण भागातील या राजकारणात फारशी मुसंडी मारता आली नव्हती. पण आता एकनाथ शिंदे यांची शिवसेना आणि अजित पवारांचा राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष सोबत असले तरी या निवडणुकीसाठी त्यांच्याबरोबर युती होईल याची कोणतीही खात्री देता येत नाही. कोणतीही स्थानिक स्वराज्य संस्था असो विधानसभा असो किंवा लोकसभा असो प्रत्येक पक्षाला स्वबळावर सत्ता मिळवण्यामध्ये रस असतो आणि राजकारणाचा पाया मानला गेलेल्या जिल्हा परिषद निवडणुकीमध्ये सुद्धा जर स्वबळावर सत्ता मिळवण्यात आली तर त्याचा थेट परिणाम आगामी विधानसभा निवडणुकीच्या निकालावरही होतो हे लक्षात घ्यावे लागते. साहजिकच आतापासूनच महायुती आणि महाविकास आघाडी यांचे घटक पक्ष विघटित होण्याची चिन्हे दिसत आहेत. अजित पवारांच्या नेतृत्वाखाली राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष पश्चिम महाराष्ट्रात अनेक ठिकाणी प्रभावशाली असल्याने या ठिकाणच्या जिल्हा परिषदा आणि पंचायत समितीमध्ये सत्ता मिळवण्यासाठी ते उत्सुक आहेत. पण गेल्या काही वर्षांमध्ये भारतीय जनता पक्षाने जाणीवपूर्वक ग्रामीण भागात लोकप्रिय असलेल्या अनेक नेत्यांना आपल्या पक्षात स्थान दिल्यामुळे त्यांच्या नेतृत्वाची कसोटीसुद्धा या निवडणुकीच्या निमित्ताने लागणार आहे. सहसा नगर परिषदा, नगरपंचायती, महानगरपालिका निवडणुकींमध्ये जे विषय असतात ते जिल्हा परिषद आणि पंचायत समितीच्या निवडणुकांमध्ये वापरले जात नाहीत. कारण, ग्रामीण भागाचे प्रश्नच वेगळे असतात. जिल्हा परिषदेच्या शाळा, आरोग्य व्यवस्था, निधी, रस्ते यासारख्या गोष्टींवरच या निवडणुकीमध्ये भर द्यावा लागतो.

# मनपा निवडणुकीच्या दिवशी शहरात खळबळ

## पिंप्राळ्यात पैशांच्या वादातून गोळीबार; बोगस मतदानाच्या संशयावरुन एकास चोप

प्रतिनिधी । जळगाव

**जळगाव महानगरपालिका निवडणुकीसाठी आज गुरुवारी शहरात मतदान प्रक्रिया शांततेत सुरु असतानाच दोन वेगवेगळ्या घटनांनी शहराचे लक्ष वेधले. पिंप्राळा भागात झालेल्या गोळीबाराच्या घटनेने भीतीचे वातावरण निर्माण झाले, तर आर.आर. विद्यालयातील मतदान केंद्रावर बोगस मतदानाच्या संशयावरून गोंधळ उडाला. या दोन्ही घटनांमुळे पोलीस प्रशासन सतर्क झाले असून शहरात बंदोबस्त वाढवण्यात आला आहे.**

शहरातील पिंप्राळा परिसरातील आनंद मंगल नगर भागात दुपारी सुमारे २ वाजेच्या सुमारास गोळीबार झाल्याची धक्कादायक घटना घडली. दोन व्यक्तींमध्ये सुरू असलेल्या जुन्या वैयक्तिक वादातून हा प्रकार घडल्याचे प्राथमिक तपासात समोर आले आहे. वाद वाढल्यानंतर एकाने रागाच्या भरात हवेत गोळीबार केला. अचानक झालेल्या गोळीबारामुळे परिसरात एकच धावपळ उडाली असून नागरिकांमध्ये दहशतीचे वातावरण पसरले. घटनेची माहिती मिळताच पोलीस अधीक्षक डॉ. महेश्वर रेड्डी यांच्यासह पोलिसांचा मोठा ताफा तातडीने घटनास्थळी दाखल झाला. परिसराची पाहणी करून नागरिकांना शांत केले.

मतदानाच्या दिवशीच ही घटना घडल्याने राजकीय वादातून गोळीबार झाल्याच्या चर्चांना उधाण आले होते. मात्र, पोलीस अधीक्षक डॉ. रेड्डी यांनी माध्यमांशी बोलताना स्पष्ट केले की, हा प्रकार पूर्णतः वैयक्तिक वादातून घडलेला असून, त्याचा महापालिका निवडणूक किंवा कोणत्याही राजकीय पक्षाशी कोणताही संबंध नाही. नागरिकांनी अफवांवर विश्वास ठेवू नये. या प्रकरणानंतर पोलीस अधीक्षक डॉ. महेश्वर रेड्डी व विभागीय पोलीस अधिकारी नितीन गणापुरे यांनी मतदान केंद्राला भेट देत परिस्थिती नियंत्रणात आणली.

### ● सकाळी आर.आर. विद्यालयात बोगस मतदानाचा संशय



शहरातील आर. आर. विद्यालय मतदान केंद्रावर सकाळी सुमारे १० वाजेच्या सुमारास तणावाची स्थिती निर्माण झाली होती. एक तरुण बोगस मतदान करण्यासाठी आल्याचा संशय व्यक्त करण्यात आला. संशय बळावल्यानंतर उपस्थित नागरिकांनी त्याला पकडून चोप दिला. या घटनेमुळे काही काळ मतदान प्रक्रिया विस्कळीत झाली. माहिती मिळताच जिल्हापेठ पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत संबंधित तरुणाला ताब्यात घेतले.

### ● राजकीय वादाशी संबंध नसल्याचे स्पष्ट

मतदानाच्या दिवशीच ही घटना घडल्याने राजकीय तणावाची चर्चा सुरु झाली होती. मात्र, पोलीस अधीक्षक डॉ. महेश्वर रेड्डी यांनी माध्यमांशी बोलताना स्पष्ट केले की, हा प्रकार पूर्णतः वैयक्तिक वादातून घडलेला असून, त्याचा महापालिका निवडणूक किंवा कोणत्याही राजकीय पक्षाशी कोणताही संबंध नाही. नागरिकांनी अफवांवर विश्वास ठेवू नये. या प्रकरणातील आरोपींचा शोध सुरु असून परिसरात चोख पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे.

दोन्ही घटनांच्या पार्श्वभूमीवर शहरातील संवेदनशील भागांत पोलिसांची गस्त वाढवण्यात आली असून, नागरिकांनी शांतता राखून निर्भयपणे मतदान करावे, असे आवाहन प्रशासनाकडून करण्यात आले आहे.

## उमवित मराठी भाषा संवर्धन पंधरवडाचे आयोजन

प्रतिनिधी । जळगाव

**कवयित्री बहीणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठातील भाषा अभ्यास प्रशाळा व संशोधन केंद्रातील मराठीविभागातर्फे मराठी भाषा संवर्धन पंधरवडानिमित्त १४ जानेवारी ते २८ जानेवारी २०२६ या कालावधीत विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. आज दि. १४ जानेवारी २०२६ रोजी प्रशाळेतील ‘साहित्य सृजन’ या भित्तीपत्रिकेचे विमोचन करून पंधरवड्याला सुरुवात करण्यात आली.**

प्रशाळेतीलविद्यार्थ्यांनी खानदेशातील आदिवासी पावरा आणि तडवी तसेच गुर्जर या अल्पसंख्याक समुदायाच्या बोली भाषेतील कविता आणि त्या बोलींची माहिती लिहिलेल्या ङ्गसाहित्य सृजनफ भित्तीपत्रिका तयार केल्या होत्या. या कार्यक्रमासाठी विद्यापीठात गवंडी काम करण्यासाठी आलेल्या अनिता सुर्यवंशी यांना आमंत्रित करण्यात आले. तर अध्यसक्षस्थानी केंद्राचे संचालक प्रा. म.सु. पगारे होते. यावेळी अनिता सुर्यवंशी (जबलपूर, म.प.) यांचा पुष्पगुच्छ आणि शाल देऊन प्रा. म.सु. पगारे यांनी सन्मान केला.

या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन नेहा लाम्हणे यांनी केले.

## जळगावात कार अडवून ३१ हजारांचा मुद्देमाल लंपास

प्रतिनिधी । जळगाव

शहरातील पिंप्राळा हुडको परिसरात जबरी चोरीची घटना घडल्याने खळबळ उडाली आहे. आरोपींनी मारहाण करत रोख रक्कम व मोबाईल फोन असा एकूण ३१ हजार रुपयांचा मुद्देमाल जबरदस्तीने हिसकावून नेल्याची फिर्यादी अक्षय एकनाथ ब्राम्हे यांनी दिलेल्या तक्रारीनुसार, १४ जानेवारी रोजी रात्री पिंप्राळा हुडको, बौद्ध विहाराजवळील सर्व्हिस रोडवर ही घटना घडली. या प्रकरणी पोलिसात गुन्हा नोंदवण्यात आला आहे.

# जळगावात बोगस मतदारांच्या संशयावरून प्रभाग ५ मध्ये राडा

## उमेदवारांमध्ये हमरातुमरी ! शिवसेना जिल्हाप्रमुखांची पोलीस ठाण्यात धाव

प्रतिनिधी । जळगाव

**जळगाव शहर महानगरपालिका निवडणुकीसाठी गुरुवारी मतदान पार पडले. दिवसभर शहरात चुरशीचे वातावरण असतानाच प्रभाग क्रमांक ५ मध्ये बोगस मतदारांच्या मुद्द्यावरून दोन उमेदवारांमध्ये जोरदार राडा झाला.**

अपक्ष उमेदवार ॲड. पियुष पाटील आणि शिवसेना (शिंदे गट) जिल्हाप्रमुख विष्णू भंगाळे यांच्यात झालेल्या या हमरातुमरीमुळे परिसरात काही काळ तणावाचे वातावरण निर्माण झाले होते. अखेर नेत्यांच्या मध्यस्थीने हा वाद थांबवण्यात आला. मात्र रात्री जिल्हापेठ पोलीस स्टेशन येथे विष्णू भंगाळे यांनी तक्रार देण्यासाठी धाव घेतली होती.

निवडणुकीच्या रणधुमाळीत प्रभाग ५ मधील आर. आर. विद्यालय मतदान केंद्राबाहेर दुपारी मोठा गोंधळ उडाला. चाळीसगाव तालुक्यातून बोगस मतदार मतदानासाठी आणल्याचा आरोप ॲड. पियुष पाटील यांनी केला. यावरून पाटील आणि विष्णू भंगाळे यांच्यात सुरुवातीला शाब्दिक चकमक झाली आणि पाहता पाहता त्याचे रूपांतर हमरातुमरीमध्ये झाले. दोन्ही बाजूचे कार्यकर्ते एकमेकांना भिडल्याने केंद्राबाहेर मोठी गर्दी जमली होती. परिस्थिती हाताबाहेर जात असल्याचे पाहून प्रतिभा शिंदे राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) यांनी तातडीने मध्यस्थी केली आणि दोन्ही उमेदवारांना शांत करण्याचा प्रयत्न केला. घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी



घटनास्थळी धाव घेत जमावाला पांगवले आणि परिस्थिती नियंत्रणात आणली. मात्र, मतदान प्रक्रिया आटोपल्यानंतर सायंकाळी हा वाद पुन्हा पोलीस ठाण्यापर्यंत पोहोचला. विष्णू भंगाळे यांनी कार्यकर्त्यांसह जिल्हा पेठ पोलीस ठाणे गाठले असून पियुष पाटील यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्याची मागणी केली होती.

## पान १ वरुन

**धुळ्यात मतदानादरम्यान......**

याकडे आता निवडणूक आयोगाच्या निर्णयाकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.दरम्यान, धुळे महानगरपालिका निवडणुकीसाठी एकूण ७४ जागा असून त्यापैकी ४ जागा बिनविरोध झाल्या आहेत. उर्वरित ७० जागांसाठी ३१६ उमेदवार रिंगणात आहेत. शहरात एकूण ५०७ मतदान केंद्रे असून त्यापैकी १३ केंद्रे संवेदनशील म्हणून घोषित करण्यात आली आहेत. या निवडणुकीत एकूण ४ लाख ३ हजार ३८७ मतदार मतदानाचा हक्क बजावणार आहेत.कायदा व सुव्यवस्था अबाधित राहावी यासाठी पोलीस प्रशासनाकडून अधिकाऱ्यांसह सुमारे १५०० पोलीस कर्मचाऱ्यांचा कडेकोट बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे.

**छ. संभाजीनगर महापालिका......**

काहीकाळ तणाव निर्माण झाला होता. स्थानिक पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, उपलब्ध पुरावे आणि साक्षीदारांच्या आधारे या दाव्याची शहानिशा केली जात आहे. मात्र, निवडणूक आयोगाकडून किंवा अधिकृत सरकारी यंत्रणेकडून अद्याप या ७०० बोगस मतदारांच्या आकड्याला अधिकृत दुजोरा मिळालेला नाही. ११५ जागेसाठी ८५९ उमेदवार मैदानात – दरम्यान, ११५ जागांच्या संभाजीनगर महापालिकेसाठी एकूण ८५९ उमेदवार रिंगणात आहेत. ११ लाख मतदारांपैकी सकाळी ११.३० वाजेपर्यंत सरासरी १८ टक्के मतदान झाले होते. राज्याच्या अन्य भागातही बोगस मतदान आणि मतदार यादीतील घोळाच्या तक्रारी समोर येत आहेत. आज सायंकाळी ५.३० वाजेपर्यंत मतदान प्रक्रिया चालणार असून, उद्या १६ जानेवारी रोजी मतमोजणी होऊन शहरावर कोणाची सत्ता येणार, याचा फैसला होणार आहे.

**जामिनासाठी मागितली दोन......**

केली. शासकीय विश्रामगृहाच्या मागील बाजूस शनिवारी रात्री सव्वाअकराच्या सुमारास ही रक्कम घेताना कल्पेशला एसीबीने अटक केली, तर गोडे व क्षीरसागर यांनी त्याला लाच घेण्यास प्रोत्साहन दिल्याचा गुन्हा नोंद आहे. दरम्यान, क्षीरसागर विश्रामगृहातच काही महिन्यांपासून मुक्कामी आहे.

**नाशकात मतदानाच्या पूर्वसंध्येला......**

‘मतदारांनी पैसे घ्यावेत, पण मत मात्र आम्हालाच द्या,’ अशी सूचनाही तीळगूळ देताना करीत आहेत. या सगळ्या प्रकारामुळे विकास, प्रश्न आणि धोरणांपेक्षा पैशांभोवतीच निवडणूक फिरत असल्याची भावना नागरिकांतून व्यक्त होत आहे. प्रचाराचा जोर वाढला असतानाच एका मतासाठी दोन ते चार हजार रुपयांपर्यंत ‘रेट’ सुरू असल्याची चर्चा उघडपणे रंगू लागली आहे. विशेष म्हणजे एका प्रभागातील नागरिक तर उमेदवारांना शेजारच्या प्रभागातील रेट सांगून अडणीत आणत आहेत. त्यामुळे निवडून आल्यावर पुन्हा वाण वाटेन, असे आश्वासन उमेदवार देत आहेत. उमेदवारांचे प्रतिनिधी घराघरांत जाऊन छुप्या पद्धतीने मतदारांना पैसे देत असल्याची जोरदार चर्चा आहे. शिक शहरातील प्रभाग क्र. १४ हा दुबई वॉर्ड म्हणून ओळखला जातो. या प्रभागातील लढाई ही पक्षाऐवजी व्यक्तींवरच अवलंबून असते. त्यामुळे या ठिकाणी यंदाच्या दरांनी रेकॉर्ड मोडल्याची चर्चा आहे. शहरात पाच-सात हजारांचा भाव फुटला असताना, येथील दर मात्र १० हजारांपर्यंत पोहोचल्याची चर्चा आहे. त्यामुळे उमेदवारांचा खिसाही चांगलाच रिकामा झाला आहे.

**अकोल्यात शिवसेना-भाजप......**

शाब्दिक चकमक झाली त्याचबरोबर अंगावर धावून गेल्याचाही प्रकार पाहायला मिळाला.

वाद विकोपाला जात असताना दोन्ही पक्षाच्या समर्थकांनी मतदान केंद्राजवळ मोठी गर्दी केली याकरिता पोलिसांना त्यांना पांगवण्यासाठी सौम्य लाठीचार्ज केला. मात्र परिस्थिती सध्या नियंत्रणात असून सुरळीत मतदान सुरू आहे. यावेळी महिलांना शिवीगाळ केली असल्याचा आरोप भाजपच्या उमेदवारांनी लगावला आहे या प्रकरणामुळे आता भाजप आणि एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेत जोरदार संघर्ष पाहायला मिळत आहे.

**जळगाव महापालिका......**

न घडता, शांततेत मतदान पार पडल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले आहे. निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार सर्व मतदान केंद्रांवर सुरक्षा व्यवस्था प्रभावीपणे राबविण्यात आली. दिवसभर कमी प्रतिसाद आणि शेवटच्या टप्प्यात झालेली गर्दी यामुळे मतदानाचा कौल नेमका कोणाच्या बाजूने झुकला आहे, हा प्रश्न आता राजकीय चर्चेचा केंद्रबिंदू ठरला आहे. कमी मतदानाचा फटका सत्ताधाऱ्यांना बसेल की विरोधकांना फायदा होईल, याबाबत विविध अंदाज व्यक्त केले जात आहेत. आज जाहीर होणाऱ्या निकालातूनच जळगावच्या सत्तेची चावी कोणाच्या हाती जाणार, हे स्पष्ट होणार असून, त्या निकालाकडे संपूर्ण शहराचे लक्ष लागले आहे



**जळगाव – शहरातील निवडणुकीच्या शेवटच्या तासांमध्ये पिंप्राळा हुडको परिसरातील प्रभाग क्रमांक १० मध्ये मतदारांचा प्रचंड उत्साह पाहायला मिळत आहे. येथील मौलाना अबुल कलाम आझाद केंद्र आणि ज्ञानसाधना प्राथमिक विद्यालय या दोन्ही केंद्रांवर मतदारांच्या लांबच लांब रांगा लागल्या असून, नागरिक मतदानासाठी मोठी धावपळ करताना दिसत आहेत.**

# भोलाणेत मकर संक्रांतीच्या दिवशी जुन्या वादातून एकाचा चॉपरने निर्घृण खून

प्रतिनिधी । जळगाव

**मकर संक्रांतीचा सण उत्साहात साजरा होत असतानाच जळगाव तालुक्यातील भोलाणे गावात बुधवारी (दि. १४ जानेवारी) दुपारी एक धक्कादायक आणि अंगावर काटा आणणारी घटना घडली. जुन्या वादातून ४५ वर्षीय इसमावर चॉपरने वार करून त्याची निर्घृण हत्या करण्यात आली. या हल्ल्यात मृताचा लहान मुलगाही जखमी झाला आहे.**

बाळकृष्ण सदाशिव कोळी (वय ४५, रा. भोलाणे, ता. जळगाव) असे मृत इसमाचे नाव आहे. बाळकृष्ण कोळी आणि संशयित आरोपी आकाश रामकृष्ण कोळी यांच्यात दीर्घकाळापासून वाद सुरू होता. बुधवारी दुपारी भोलाणे गावातील बस स्टँड परिसरात हा वाद पुन्हा उफाळून आला. रागाच्या भरात आकाश कोळी याने बाळकृष्ण यांच्यावर चॉपरने हल्ला चढवला. वर्मी ठिकाणी तीन वार झाल्याने बाळकृष्ण कोळी यांचा जागीच मृत्यू झाला. हल्ल्याच्या वेळी बाळकृष्ण यांचा लहान मुलगा वडिलांना वाचवण्यासाठी मध्ये धावला. मात्र आरोपीच्या चॉपरचा वार त्याच्या हाताला लागल्याने तो गंभीर जखमी झाला आहे. त्याच्यावर उपचार



सुरू आहेत. सणासुदीच्या दिवशी भररस्त्यात घडलेल्या या थरारक घटनेमुळे संपूर्ण गावात भीतीचे वातावरण पसरले आहे. मयताच्या नातेवाईकांच्या माहितीनुसार, मुख्य आरोपी आकाश कोळी याच्यासोबत त्याचे वडील रामकृष्ण ताराचंद कोळी व काका प्रकाश ताराचंद कोळी हे देखील घटनास्थळी उपस्थित होते. त्यांच्या उपस्थितीतच हा हल्ला झाल्याचा आरोप करण्यात आला आहे. बाळकृष्ण कोळी हे मजुरी करून आपल्या कुटुंबाचा उदरनिर्वाह करत होते. त्यांच्या आकस्मिक मृत्यूमुळे कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे. त्यांच्या पश्चात वृद्ध आई-वडील, भाऊ, पत्नी तसेच जयेश व विशाल ही दोन मुले असा परिवार आहे.

या प्रकरणी मृताचे भाऊ नरेंद्र सदाशिव कोळी यांनी दिलेल्या फिर्यादीवरून जळगाव तालुका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आरोपी घटनास्थळापासून पसार झाला असून त्याच्या शोधासाठी पोलिसांची पथके रवाना करण्यात आली आहेत.

## विनायल क्लोराईड या विषयावर एकदिवसीय कार्यशाळेचे आयोजन

प्रतिनिधी । जळगाव

कवयित्री बहीणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठातील येथील रसायनशास्त्र प्रशाळेत प्रॉस्पेक्टस ऑफ पॉली (विनायल क्लोराईड) या विषयावर एकदिवसीय कार्यशाळेचे आयोजन दि. १३ जानेवारी, २०२६ रोजी करण्यात आले.

ही कार्यशाळा रसायनशास्त्र प्रशाळेच्या तसेच विद्यापीठातील रासायनिक तंत्रज्ञान संस्था विद्यार्थ्यांसाठी आयोजित करण्यात आली होती. या कार्यशाळेचा मुख्य उद्देश पॉलिमर क्षेत्रातील नव्याने उदयास येणारे ट्रेंड्स, औद्योगिक उपयोग तसेच पॉली (विनायल क्लोराईड) तंत्रज्ञानातील करिअरच्या संधी याबाबत विद्यार्थ्यांना सखोल माहिती देणे हा होता. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान प्रशाळेचे संचालक प्रा. दलाल यांनी भूषविले.

हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक, मुख्य संपादक – सागर काशिनाथ ओतारी (मोबा.- ९९७००५३०६६) व मालक रेखाबाई काशिनाथ ओतारी यांनी श्री समर्थ कृपा डिजिटल प्रिंटर्स, पी -३३, औद्योगिक वसाहत शॉपिंग कॉम्प्लेक्स, जुनी एमआयडीसी, जळगाव -४२५००१ येथे छापून शॉप नं. ई-१२, चौथा मजला, गोलाणी मार्केट, जळगाव- ४२५००१ (महाराष्ट्र), येथे प्रसिद्ध केले.
* कार्यकारी संपादक – किशोर शंकर शिंपी (* पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची राहील) (RNI-MAHMAR/2023/89125) कार्यालय दूरध्वनी क्र. : ०२५७-२२२४०६६, E-Mail : shauryamarathi@gmail.com

## थोडक्यात

### सोनगीरपाडा आश्रमशाळेत भूगोल दिन साजरा

**शहादा ।** तालुक्यातील सोनगीरपाडा येथील नंताविस संचलित अनुदानित प्राथमिक, माध्यमिक आश्रमशाळा सोनगीरपाडा येथे राष्ट्रीय भूगोल दिवस साजरा करण्यात आला. भूगोल दिनानिमित्त विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. विद्यार्थ्यांना पर्यावरण वाचवा, जीवन वाचवाचा नारा दिला प्रा. विजय पाटील यांनी दिला. प्रा.बी.बी. राजपूत यांनी देखील आपले मनोगत व्यक्त केले. अध्यक्षस्थानी प्राचार्य मनोज मराठे होते. सूत्रसंचालन प्रा. डॉ. विठ्ठल काळे यांनी

### दाब आश्रमशाळेत सावित्रीबाई फुले जयंती साजरी

**अक्कलकुवा ।** शासकीय माध्यमिक आश्रम दाब ता. अक्कलकुवा जि. नंदुरबार येथील शाळेत क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांची जयंती साजरी करण्यात आली. कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुण्या म्हणून मोतनबाई पाडवी उपस्थित होत्या. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शाळेचे मुख्याध्यापक के. सी. कोकणी होते. कार्यक्रमाची सुरुवात सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून करण्यात आली. यावेळी विद्यार्थ्यांनी सावित्रीबाई फुले यांच्या जीवनकार्यावर मनोगत व्यक्त केले.

# धुळे वखार महामंडळाच्या गोदामात आज मतमोजणी

## ● प्रथम टपाली मतपत्रिकांची गणना; प्रभागानुसार सहा कक्षात एकाच वेळी मतमोजणी

**प्रतिनिधी । धुळे**

धुळे महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूकीची मतदान प्रक्रिया पूर्ण झालेली असून आज दि. १६ जानेवारी २०२६ रोजी कृषी उत्पन्न बाजार समिती आवारातील वखार महामंडळाच्या गोदामात मतमोजणी प्रक्रिया सकाळी १० वाजे पासून सुरु होणार आहे.

मतमोजणी प्रक्रियेसाठी निवडणूक निर्णय अधिकारी यांना नेमूण दिलेल्या प्रभागानुसार सहा कक्षात एकाच वेळी मतमोजणी प्रक्रिया सुरु होणार आहे. यात प्रथम टपाली मतपत्रीकांची गणना केली जाणार आहे. तनंतर प्रत्येक निवडणूक निर्णय अधिकारी यांच्या कक्षात सुमारे १० ते १४ मतगणनेच्या फेरी होणार आहेत. यात प्रथम प्रभाग क्रमांक १.५.८.३.१४.१७ तद्नंतर प्रभाग क्रमांक २.६.१२.९.१५.१८ व नंतर ४.७.१३.१०.१६.१९ या प्रमाणे ३ टप्प्यात प्रभागनिहाय मतगणना करण्याचे नियोजन आहे. सदर गोदामातील मर्यादीत जागा लक्षात घेता उमेदवार व त्यांचे प्रतिनिधी यांना प्रभागनिहाय निश्चीत केलेल्या टप्पयानुसार मतमोजणी कक्षात प्रवेश दिला जाणार आहे.

प्रथम टप्यातील प्रभाग क्रमांकाची मतगणना पूर्ण झाल्यावर दुसऱ्या टप्प्यातील प्रभागांच्या उमेदवार व त्यांच्या प्रतिनिधीना मतमोजणी कक्षात प्रवेश देण्यात येईल. यासाठी मतमोजणी कक्षालगत असलेल्या शेडमध्ये उर्वरीत उमेदवार व मतमोजणी प्रतिनिधीसाठी प्रतिक्षा कक्षाची व्यवस्था करण्यात आलेली आहे. प्रभाग निहाय टप्पा पूर्ण झाल्यावर ध्वनिक्षेपकाद्वारे सूचना देण्यात येणार आहे.

मतमोजणी प्रकियेसाठी निवडणूक निर्णय अधिकारी यांनी त्यांच्या कार्यकक्षेत मतगणना कर्मचारी पथक नियुक्त केलेले आहे. त्यांच्या नियंत्रणात मतगणना होणार आहे. सदर संपूर्ण प्रक्रियेप्रसंगी मुख्य निवडणूक निरीक्षक ओमकार पवार व निवडणूक निरीक्षक देवदत्त केकान तसेच आयुक्त तथा निवडणूक अधिकारी नितीन कापडणीस उपस्थित राहणार आहे.

मतमोजणी कक्षात फक्त अधिकृत ओळखपत्रधारकांनाच प्रवेश दिला जाणार आहे. उमेदवार व त्यांच्या मतमोजणी प्रतिनिधीना फक्त बाहेरील प्रवेशव्दारापर्यंत वाहनाने सोडण्यास परवानगी आहे.

मतमोजणी केंद्राच्या आत मोबाईल व इलेक्ट्रॉनिक वस्तूंवर सक्त बंदी राहील. उमेदवार व त्यांचे प्रतिनिधी यांना कोणत्याही परिस्थितीत मोबाईल , इलेक्ट्रॉनिक वस्तू वापरण्यास परवानगी नसेल. पत्रकारांसाठी स्वतंत्र पत्रकार कक्ष असून पत्रकार कक्षात मोबाईल व इलेक्ट्रॉनिक वस्तु बाळगू शकतात. सर्व उमेदवार व प्रतिनिधी यांनी प्रशासनाने दिलेल्या सूचनांचे काटेकोर पालन करावे व मतमोजणी प्रक्रिया शांततेत व सुरळीत पार पाडण्यासाठी सहकार्य करावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

# केळीला भाव नसल्याने शेतकऱ्यांवर आर्थिक संकट

**प्रतिनिधी । शहादा**



**जळगाव जिल्ह्याप्रमाणे शहादा व नंदुरबार तालुका केळी लागवडीसाठी अग्रेसर आहे. पण चालू वर्षी केळी पिकाला योग्य भाव मिळत नसल्याने काथर्दा खुर्द, कलमाडी व परिसरातील शेतकऱ्यांनी केळीचे घड झाडापासून वेगळी करून गुरांना चारा म्हणून विकत आहे.**

अनेक वर्षापासून ऊस पिकावर जास्त भर दिला जात होता. परंतु शिरपूर, नवलनगर, साक्री आधी साखर कारखाने बंद झाले आहेत. शहादा समशेरपुर येथील कारखाने सद्यस्थितीत सुरू आहे. त्यामुळे ऊस पिक लागवडीकडे दुर्लक्ष करून केळी पिकाकडे शेतकऱ्यांचे लक्ष वेधले गेले. पण गेल्या दोन वर्षापासून केळी पिकाला योग्य भाव मिळत नाही. आता ९००/११०० रुपयापर्यंत गेल्या एक महिन्यापासून भाव स्थिर झाला पण भाव अगोदर कमी असल्याने अगोदरच्या केळी कमी भावात विकावी लागली.

शेतात पीक असल्यावर भाव चांगले राहतात. पण शेतकऱ्याचा माल बाजारात आला तर व्यापारी हमीभावापेक्षा कमी भावाने शेतकऱ्याच्या मालाची मागणी करतात. त्यामुळे शेतकऱ्याची आर्थिक स्थिती दिवसेंदिवस खालावत चालली आहे.

**आता भाव आहे. पण व्यापाऱ्यांकडून कमी भावात मालाची मागणी, जागतिक मंदी, निवडणुकांचे वारे आदी कारणाने मागणी कमी झाली आहे. नाईलाजाने तयार झालेली केळी शेतकरी गाई पाळणारे ठेलारी यांना मातीमोल भावाने विकत आहेत. काही शेतकऱ्यांनी तर केळीचे घड लागलेल्या उभ्या झाडांवर नांगर फिरवले आहेत. गेल्या २ वर्षापासून मका, गहू, ऊस, सोयाबीन, केळी यासारख्या बागायती पिकांना योग्य भाव मिळत नाही. एकीकडे महागडी रोपे, खते, वाढती मजुरी, अनियमित वीज पुरवठा या अनेक कारणाने शेतकरी हा तास झाला आहे.**

राज्यकर्त्यांनी शेतकरी सुखी व आर्थिक रित्या सक्षम कसा होईल याबाबतीत गंभीरपणे विचार करण्याची वेळ आली आहे.

# गुरुद्वारा परिसरात ५ लाखांची देशी बनावटीचे पिस्टलसह रायफल जप्त

**प्रतिनिधी । धुळे**

**धुळे शहर पोलीस ठाण्यात दाखल भारतीय हत्यार कायदा कलम ३/२५ प्रमाणे दि. १० जानेवारी रोजी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.**



या प्रकरणात आरोपी रणविरसिंग सुखदेवसिंग खालसा (वय ३६, रा. गुरुद्वारा, गुरुनानक साहेब, मुंबई-आग्रा रोड, धुळे; मुळ रा. १० डीडब्ल्यू एम ता. रावतसर, जि. हनुमानगढ, राजस्थान) याच्याकडून देशी बनावटीचे अग्निशस्त्र व मॅगझिन जप्त करण्यात आले. गुरुद्वारा परिसरातील निवासस्थानातून तपासादरम्यान जिवंत काडतुसे व मॅगझिन आढळून आली. गुन्ह्याचा तपास पोलीस निरीक्षक दीपक पाटील यांच्या आदेशान्वये पोउनि समाधान सोळंके यांच्याकडे सोपविण्यात आला. सखोल चौकशीत चार लाख रुपये किमतीची काळ्या रंगाची ४५ कॅलिबर पिस्टल, ५ हजाराची स्टील मॅगझिन, दोन हजाराची रायफल मॅगझिन असा एकूण ५ लाख ७ हजार रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. ही कारवाई पोलीस अधीक्षक श्रीकांत धिवरे, अप्पर पोलीस अधीक्षक अजय देवरे, उपविभागीय पोलीस अधिकारी राजकुमार उपासे व पोलीस निरीक्षक दीपक पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली पोउनि समाधान सोळंके व शोध पथकातील अंमलदारांनी केली.

## बोराडीत राष्ट्रीय युवा दिवस

**प्रतिनिधी । धुळे**

किविप्र संस्था संचलित, येथील मातोश्री बनुमाय कन्या माध्यमिक विद्यालयात स्वामी विवेकानंद यांची जयंती राष्ट्रीय युवा दिवस म्हणून तसेच राजमाता जिजाऊ यांची जयंती साजरी झाली. अध्यक्षस्थानी बोराडी केंद्राचे केंद्रप्रमुख अभय पाटील होते. यानिमित्त विद्यालयात राष्ट्र उभारणीत युवकांचा सहभाग या विषयावर वक्तृत्व स्पर्धा घेण्यात आली. सुत्रसंचालन वैशाली पवार यांनी केले.

# नवापूर येथे एस.टी – स्कॉर्पिओची धडक; चालक जखमी

**प्रतिनिधी । नवापूर**

**शहरातील महामार्गावर ओव्हरटेक करत असतांना एस.टी. बसने स्कॉर्पिओला धडक दिली. यात स्कॉर्पिओ चालक जखमी झाला असून वाहनाचे नुकसान झाले आहे.**




नवापूर शहराजवळील नॅशनल हायवे क्रमांक ६ वर वीज कार्यालय परिसरात आज दुपारी अपघाताची घटना घडली. नवापूरहून करंजवेलकडे जाणारी एस.टी. बस (एमएच २० बीएल ३५४९) ओव्हरटेक करत असताना स्कॉर्पिओ चारचाकी वाहनाला (जीजे २६ के २००९) धडक दिली. या धडकेत दोन्ही वाहनांचा अपघात झाला. अपघातात स्कॉर्पिओ वाहनाचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले असून स्कॉर्पिओ चालक अल्पेश तुकाराम कोकणी (रा. देवलळफळी) हे जखमी झाले आहेत. त्यांना तातडीने उपचारासाठी नव-पूर उपजिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आले असून त्यांच्यावर उपचार सुरू आहेत.

घटनेची माहिती मिळताच पोलिस उपनिरीक्षक भाऊसाहेब लांडगे, पोलीस हवालदार नरेंद्र गुरव यांनी घटनास्थळी भेट देऊन पंचनामा केला आहे. पुढील तपास नवापूर पोलिसांकडून सुरू आहे.

## तृतीयपंथीयांसाठी राष्ट्रीय हेल्पलाईन सेवा

**प्रतिनिधी । धुळे**

केंद्र सरकारने ट्रान्सजेंडर व्यक्ती (हक्कांचे संरक्षण) कायदा, २०१९ व नियम २०२० अंतर्गत तृतीयपंथीय समाजातील व्यक्तींसाठी राष्ट्रीय हेल्पलाईन क्रमांक १४४२७ सुरू केला आहे. अशी माहिती समाज कल्याण सहाय्यक आयुक्त संजय सैंदाणे यांनी दिली आहे. या कायद्यानुसार तृतीयपंथीय व्यक्तींसाठी केंद्र सरकारने स्वतंत्र ऑनलाइन पोर्टल विकसित केले असून त्यामार्फत ही हेल्पलाईन सेवा उपलब्ध करून देण्यात आली आहे. या हेल्पलाईनवर तृतीयपंथीय व्यक्तींना शासकीय योजनांची माहिती, अर्ज प्रक्रियेबाबत मार्गदर्शन, अडचणींचे निराकरण, तक्रारी नोंदविण्याची सुविधा मिळेल.

# कढेल जि.प.प्राथ.शाळेत संगणक प्रयोगशाळेचे उद्घाटन

**प्रतिनिधी । तळोदा**

तालुक्यातील कढेल जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत माजी विद्यार्थी संघ व ग्रुप ग्रामपंचायत कढेल यांच्या संयुक्त विद्यमाने नव्याने उभारण्यात आलेल्या संगणक प्रयोगशाळेचे उद्घाटन मकर संक्रांतीच्या पावन पर्वावर गटविकास अधिकारी राजू किरवे यांच्या हस्ते तर सहाय्यक गटविकास अधिकारी काशिनाथ पवार, गटशिक्षणाधिकारी शेखर धनगर, केंद्रप्रमुख युवराज मराठे यांच्या उपस्थित संपन्न झाले.



कार्यक्रमाच्या प्रारंभी शाळेतील विद्यार्थ्यांनी पारंपरिक पद्धतीने मान्यवरांचे औक्षण करून स्वागत केले. त्यानंतर दीपप्रज्वलन करून उद्घाटन सोहळ्याची सुरुवात करण्यात आली. विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या स्वागतगीतामुळे कार्यक्रमाचे वातावरण प्रसन्न झाले.

उद्घाटनप्रसंगी मार्गदर्शन करताना गटविकास अधिकारी राजू किरवे यांनी, आजच्या डिजिटल युगात संगणक साक्षरता ही काळाची गरज असून ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांनाही आधुनिक तंत्रज्ञानाची ओळख होणे अत्यंत महत्त्वाचे आहे. माजी विद्यार्थी संघ व ग्रामपंचायतीचा हा उपक्रम निश्चितच अनुकरणीय आहे, संगणक प्रयोगशाळेमुळे विद्यार्थ्यांची अध्ययन क्षमता वाढेल, त्यांच्यात आत्मविश्वास निर्माण होईल तसेच भविष्यातील स्पर्धांसाठी ते सज्ज होतील, असे प्रतिपादन केले. मकर संक्रांतीनिमित्त गुणवत्तेचा पतंगोत्सव साजरा करण्यात आला. या उपक्रमांतर्गत विद्यार्थ्यांनी तयार केलेल्या पतंगांवर चांगल्या सवयी, मूल्यशिक्षण व सामाजिक जाणीव यावर आधारित विविध घोषवाक्ये लिहिण्यात आली. स्वच्छता ठेवा – आरोग्य जपा, वेळेचे महत्त्व ओळखा, आई-वडिलांचा आदर करा, नियमित वाचन करा, पर्यावरणाचे संरक्षण करूया, व्यसनांना नाही म्हणा अशा घोषवाक्यांमुळे संपूर्ण परिसरात जनजागृती संदेश दिला. या पतंगोत्सवातून विद्यार्थ्यांमध्ये सर्जनशीलता, शिस्त, सकारात्मक सवयी व गुणवत्तेची जाणीव निर्माण करण्याचा प्रयत्न करण्यात आला. प्लास्टिकमुक्त व पर्यावरणपूरक पतंगांचा वापर करून पर्यावरण संवर्धनाचाही संदेश देण्यात आला. मार्गदर्शन करताना गटशिक्षणाधिकारी शेखर धनगर यांनी, शैक्षणिक प्रगतीसोबतच विद्यार्थ्यांमध्ये चांगल्या सवयी व मूल्यांची जोपासना होणे आवश्यक आहे. असे प्रतिपादन केले.

# धर्म जागरण संस्थेच्या शबरीधाम पदयात्रेला प्रतिसाद

**प्रतिनिधी । पिंपळनेर**

धर्म जागरण संस्थेतर्फे शबरीधाम पदयात्रा काढण्यात आली. त्यात जळगाव, भुसावळ, चोपडा, रावेर, साक्री, पिंपळनेर, बोपखेल, वार्सा, देवळीपाडा, मळगाव, विरखेल, नवापूर, उमरपाटा व डांग जिल्ह्यातील हजारो भाविक या राम आगमन पदयात्रेत सामिल झाले होते. ही पदयात्रा मळगाव येथील राम पादुका मंदिरापासुन, योगी दत्तनाथ महाराज शिंदखेडा व स्वामी आसिमानंद यांच्या नेतृत्वात निघाली. ती वार्सा, पिंपळदहाडमार्गे शबरी धामकडे निघाली, यावेळी डांग जिल्ह्यातील आमथवा येथे भाविक विश्रांतीसाठी जंगलात थांबले. या ठिकाणी पिंपळनेर येथील सामाजिक कार्यकर्ते जयवंत बागड, देविदास चौधरी, रिखबचंद जैन, पत्रकार सुभाष जगताप, वाल्मिक पाटील, विशाल गांगुर्डे, निलेश शिंपी, देवेंद्र गांगुर्डे, अंबादास बेनुस्कर, रावसाहेब काका, डॉ. देवरे, विनोद जाधव, सागर येवले यांनी कढी खिचडीचे वाटप केले.

# धुळे शहरात मतदानासाठी आज वाहतूक मार्गात बदल

## महापालिका निवडणूक पार्श्वभूमीवर निर्णय

**प्रतिनिधी । धुळे**

महापालिका निवडणूकेसाठी दि. १६ रोजी मार्केट यार्ड पारोळारोड, धुळे या ठिकाणी मतमोजणी होणार आहे. यासाठी शहरातील वाहतूक मार्गात तात्पुरता बदल करण्यात येत असल्याची माहिती जिल्हा पोलिस अधीक्षक श्रीकांत धिवरे यांनी दिली.

या मार्गावर मोठया प्रमाणात गर्दी होवून वाहतूकीची कोंडी होण्याची शक्यता असल्याने खबरदारीचा उपाय म्हणून दि. १६ जानेवारी, रोजी सकाळी ६ ते रात्री १२ वाजेपर्यंत पारोळा चौफुली ते झाशी राणी पुतळा, शिवाजी महाराज यांचे पुतळा ते गांधी मार्गात तात्पुरता बदल करण्यात येत आहे पुतळा, गांधी पुतळा ते गिंदोडिया चौक, तिरंगा चौक, लोकमान्य हॉस्पिटल, कराची चौक ते मार्केट यार्डे, शेतकरी पुतळा, पारोळा चौफुली, जळगावकडे जाणारा मार्गातील शहरातील वाहतूक बसस्थानकाहून महामंडळाच्या बसेस धुळे शहरात बसस्थानकाकडे जळगाव, अमळनेर येथून येणारे व जाणारे बसेस हया पारोळा चौफली, चाळीसगाव चौफुली, युनिटी सर्कल, डी मार्ट, दसेरा मैदान, फाशीपुल यामार्गान बसस्टॅन्ड येथे येतील व त्याच मार्गान जातील.

वरील निर्बंध पोलीस सेवेतील वाहने, रुग्णवाहिका व अग्निशमन दलाची वाहने यांना लागू राहणार असल्याची माहिती जिल्हा पोलिस अधिक्षक धिवरे यांनी दिली.

## जिल्हास्तरीय महिला लोकशाही दिनाचे १९ रोजी आयोजन

**प्रतिनिधी । नंदुरबार**

महिलांच्या तक्रारी, अडचणींची सोडवणूक शासकीय यंत्रणेकडून करण्यासाठी व समाजातील पिडीत महिलांना मार्गदर्शनाची सुविधा उपलब्ध व्हावी यासाठी दरमहा जिल्हास्तरीय महिला लोकशाही दिनाचे आयोजन करण्यात येत असून जानेवारी महिन्यात १९ जानेवारी रोजी दुपारी ०१.०० वाजता रंगावली सभागृह जिल्हाधिकारी कार्यालय नंदुरबार येथे जिल्हास्तरीय महिला लोकशाही दिनाचे आयोजन करण्यात आले आहे, असे सदस्य सचिव महिला लोकशाही दिन तथा जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी संजय पाटील यांनी कळविले आहे.

# धुळे शहराचा विकास करणाऱ्यांच्या पाठीशी राहा


## आ. अनुप अग्रवाल यांचे महापालिका शाळा क्रमांक २९ मधील मतदान केंद्रावर परिवारासह मतदान

**प्रतिनिधी । धुळे**

**येथील महापालिकेच्या निवडणुकीसाठी आज मतदानाची प्रक्रिया सुरू असून, धुळेकर उत्स्फूर्तपणे सहभागी होत आहेत. उद्या निवडणुकीच्या निकालातून शहराच्या विकासाला जनता कोणाला पसंती देणार, याचा फैसला होणार आहे.**

भाजपला ५५ जागा मिळतील, असा विश्वास आहे. धुळेकर जनतेला मी नम्रतेने विनंती करतो, की आपण सर्वांनी मतदान करण्यासाठी आपल्या मतदान केंद्रांवर पोहोचा आणि विकासासोबत राहून ज्यांनी गेल्या पाच वर्षांत शहराच्या विकासाला प्राधान्य, चालना दिली, शहरात अनेक योजना राबविल्या आणि भविष्यातही ज्या योजना, प्रकल्प राबवू शकतील अशा उमेदवारांच्या पाठीशी राहून आपला मतदानाचा हक्क बजावावा, असे आवाहन शहराचे आमदार अनुप अग्रवाल यांनी केले.

आमदार अग्रवाल यांनी आज सकाळी साडेआठला शहरातील महापालिका शाळा क्रमांक २९ मधील मतदान केंद्रावर आपल्या परिवारासह मतदानाचा हक्क बजावला, त्यानंतर प्रसारमाध्यमांच्या प्रतिनिधींशी संवाद साधताना ते बोलत होते.



**महिला उमेदवाराच्या बदनामीचा प्रकार दुर्दैवी**

आमदार अग्रवाल म्हणाले, की जनता शहराचा विकास करणाऱ्या भारतीय जनता पक्षाच्या पाठीशी आहे. भाजपसाठी चांगले वातावरण असून, पक्षाचे ५५ उमेदवार विजयी होतील, आणि उद्या निकालानंतर भाजपकडेच सत्ता येईल, असा ठाम विश्वास आहे. प्रभाग २ मध्ये झालेल्या प्रकाराबाबत पत्रकारांनी प्रश्न केला असता आमदार अग्रवाल म्हणाले, की काही लोकांना वातावरण दूषित करण्याचा प्रयत्न केला. बुधवारी सायंकाळी प्रभाग २ मध्ये जी घटना घडली, ती अतिशय दुर्दैवी आहे. या घटनेची सर्व धुळेकरांनी सत्यता जाणून घेण्याची गरज आहे. विरोधकांकडून भाजपच्या महिला उमेदवाराचा अपमान करणे कितपत योग्य आहे आणि उलट त्यांच्याकडूनच आकांडतांडव केला जात आहे. मात्र, धुळेकर जनतेला याची सर्व जाणीव आहे. विरोधकांकडून महिला उमेदवाराची कशी बदनामी केली जात होती, हेही जनता जाणून आहे. शिवसेनेच्या काही लोकांनी या महिला उमेदवारावर हातही टाकला. मात्र, यातून निवडणुकीच्या प्रक्रियेला, तसेच शहराच्या शांततेला गालबोट लागू नये म्हणून आम्ही काल काही बोललो नाही. विरोधकांमधील आपापसांतील वादातून घडलेला हा प्रकार असून, त्याचे बालंट त्यांनी भारतीय जनता पक्षावर उलटविण्याचा हास्यास्पद प्रकार करत भाजपला गाडण्याची भाषा केली आहे. आज प्रभाग दोनमधील जनताच मतदानातून दाखवून देईल, की कोण कोणाला गाडणार आहे.

## दारू व्यापाऱ्याच्या आस्थापनेवर आयकर विभागाची कारवाई

**प्रतिनिधी । धुळे**

**नाशिक व जळगाव येथील आयकर विभागाच्या टीडीएस पथकाने संयुक्त आयकर आयुक्त (टीडीएस), रेंज नाशिक यांच्या मार्गदर्शनाखाली नंदुरबार येथील दारू व्यवसाय करणाऱ्या त्रिमूर्ती ट्रेडर्स तसेच पूर्वी मार्केटिंग्सचे मालक सदानंद पृथ्वीराज झरवार यांच्या आस्थापनेवर सर्वेक्षण केले.**

या सर्वेक्षणादरम्यान दिवसभर विविध कागदपत्रांची सखोल तपासणी करण्यात आली. आस्थापनेच्या चालू आर्थिक वर्षात सुमारे ५५ कोटी रुपयांची दारू विक्री झाल्याचे निदर्शनास आले. मात्र या विक्रीवर लागू असलेला १ टक्का कर (टीसीएस) ५५ लाख रुपये शासकीय तिजोरीत जमा करण्यात आलेला नव्हता.

या अनुषंगाने आयकर विभागाच्या टीडीएस अधिकाऱ्यांनी सखोल चौकशी केली. चौकशीअंती संबंधित व्यापाऱ्याकडून तातडीने ५५ लाख रुपये शासकीय तिजोरीत भरणा करून घेण्यात आला. तसेच मागील थकबाकीपोटी उर्वरित ५० लाख रुपये १५ दिवसांच्या आत भरण्यासाठी व्यापाऱ्यांनी मुदत मागितली आहे.

# भुसावळ पालिकेच्या उपनगराध्यक्षपदी शैलजा नारखेडे

## चार नगरसेवक तटस्थ : माजी आमदार संतोष चौधरींसह पाच स्वीकृत नगरसेवकांची निवड

प्रतिनिधी । भुसावळ

**भुसावळ पालिकेतील उपनगराध्यक्ष पदासाठी गुरुवारी अत्यंत चुरशीच्या वातावरणात निवडणूक प्रक्रिया झाली. भाजपाकडे संख्याबळ अधिक असताना उपनगराध्यक्षांची निवड बिनविरोध होईल ही शक्यता धूसर ठरली. राष्ट्रवादी शरद पवार गटातर्फे सुनीता कृष्णधन कर यांचे तर भाजपातर्फे शैलजा पुरूषोत्तम नारखेडे यांचे नामांकन दाखल करण्यात आल्यानंतर हात उंचावून मतदान घेण्यात आले. यावेळी नारखेडे यांना ३२ तर कर यांना १५ मते मिळाल्याने नारखेडे यांची उपनगराध्यक्षपदी निवड जाहीर करण्यात आली. यावेळी**



**माजी आमदार संतोष चौधरींसह पाच स्वीकृत सदस्यांचीही निवड झाली.**

भुसावळ प्रांताधिकारी कार्यालयात गुरुवारी दुपारी १२ वाजता निवड प्रक्रियेला प्रारंभ झाला. व्यासपीठावर पीठासन अधिकारी तथा नगराध्यक्षा गायत्री भंगाळे, मुख्याधिकारी राजेंद्र फातले, उपमुख्याधिकारी परवेज शेख, ओएस अजित भट यांची उपस्थिती होती.

मतदान प्रसंगी काँग्रेसच्या नगरसेविका काजल मोरे व रोहन सूर्यवंशी तसेच अपक्ष नगरसेवक आसीफ खान व मानवी आहुजा यांनी तटस्थ म्हणून भूमिका वठवत सभागृहाचे लक्ष वेधले. शैलजा नारखेडे यांची ही तिसरी टर्म आहे. यापूर्वी त्या २०११, २०१६ व आताच्या २०२५ मधील निवडणुकीत विजयी झाल्या आहेत तर त्यांचे पती पुरूषोत्तम नारखेडे हे १९९६ व २००५ मध्ये झालेल्या निवडणुकीत विजयी झाले आहेत. नुकत्याच झालेल्या पालिका निवडणुकीत भाजपा उमेदवार रजनी संजय सावकारे यांचा एक हजार ८४७ मतांनी पराभव झाला तर लेवा समाजाच्या उमेदवार गायत्री गौर-भंगाळे येथे विजयी झाल्या.

भाजपाला बसलेल्या अनपेक्षित फटक्यानंतर व लेवा समाजाची मते विरोधात गेल्यानंतर डॅमेज कंट्रोल व आगामी निवडणुकांची रणधुमाळी पाहता लेवा समाजाला प्रतिनिधीत्व देण्याचा प्रयत्न मंत्री सावकारे यांनी येथे केल्याचे दिसून येते. लेवा समाजाला महिला उपनगराध्यक्ष तसेच तीन्ही स्वीकृत नगरसेवकदेखील लेवा समाजाचेच देण्यात आल्याने मंत्र्यांची दूरदृष्टी येथे दिसून येते. यावेळी भाजपातर्फे नितीन बाबूराव धांडे, डॉ.प्रसाद वासुदेव बोंडे व संजयकुमार सुशीलकुमार नाहाटा यांना संधी स्वीकृत नगरसेवक पदाची संधी देण्यात आली. शिवसेना-राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी व अपक्ष गटातर्फे संतोष दाढी चौधरी यांना तर राष्ट्रवादी शरदचंद्र पवार गटातर्फे माजी आमदार संतोष चौधरी यांना स्वीकृत नगरसेवक पदाची संधी मिळाली. प्रांताधिकारी कार्यालयात निवड प्रक्रिया सुरू करण्यापूर्वी राष्ट्रगीत व राज्यगीत मोबाईलवर लावण्यात आले.

### ➤ नारखडे यांची उपनगराध्यक्षपदी निवड

राष्ट्रवादी गटनेता सचिन चौधरी यांनी उपनगराध्यक्ष पदासाठी बॅलेट पेपरवर निवडणूक घेण्याची मागणी केली मात्र मुख्याधिकार्यांनी नियम वाचून दाखवत उपनगराध्यक्ष निवडीसाठी हात उंचावून मतदान घेण्यात येईल, असे जाहीर केले. राष्ट्रवादीच्या सुनीता कृष्णधन कर यांच्या बाजूने राष्ट्रवादी गटातील १४ व अपक्ष नगरसेवक राज विजय चौधरींनी हात उंचावून मतदान केले तर भाजपातर्फे शैलजा नारखेडे भाजपा गटातील २७ तसेच राष्ट्रवादी अजित पवार गट, शिवसेना शिंदे गट व अपक्ष मिळून पाच अशा मिळून ३२ नगरसेवकांनी हात उंचावून मतदान केल्याने त्यांची उपनगराध्यक्षपदी निवड करण्यात आली.

## एरंडोलमध्ये रविवारी रक्तदान शिबिराचे आयोजन

प्रतिनिधी । एरंडोल

रक्तदान हेच जीवनदान हा उदात विचार उराशी बाळगून, शहरातील रा. ति. काबरे विद्यालयाच्या प्रांगणात येत्या रविवारी १८ जानेवारी रोजी सकाळी ९ ते दुपारी ४ वाजेपर्यंत एका भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. स्वामी विवेकानंद यांची १६३ वी जयती, वंदे मातरम् या राष्ट्रगीताचा १७० वा वर्धापनदिन आणि योगेश्वर नागरी सहकारी पतसंस्थेचा ३५ वा वर्धापनदिन अशा त्रिवेणी संगमाचे औचित्य साधून या शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. विवेकानंद केंद्र एरंडोल, योगेश्वर नागरी रूहकारी पतसंस्था मर्या. एरंडोल आणि माधवराव गोळवलकर स्वयंसेवी रक्तकें जळगाव यांच्या संयुक्त विद्यमाने हे शिबीर होणार आहे.

## थोडक्यात

### भाटपुरी गावात चार हजार बनावट जन्मनोंदी

**पारोळा ।** तालुक्यात नसलेल्या भाटपुरी गावाचा बोगस आयडी तयार करून ४ हजार ९०० खोट्या जन्म नोंदी केल्याने बिहारच्या तरुणाविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. त्याला ताब्यात घेण्यासाठी पारोळा पोलिस यवतमाळला रवाना झाले आहे. संशयित आता यवतमाळ पोलिसांच्या ताब्यात आहे. बिहारमधील आदर्शकुमार उर्फ विक्की अशोक दुबे या तरुणाविरुद्ध बनावट जन्म नोंदी प्रकरणी डिसेंबर महिन्यामध्ये यवतमाळ पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात झाला होता. विक्की दुबेने पारोळा तालुक्यात अस्तित्वात नसलेल्या भाटपुरी गावाचा बोगस आयडी तयार करून त्याआधारे ४ हजार ९०७ जन्म नोंदी संबधितांना दिल्या असल्याची माहिती तपासात उघड झाली आहे. या प्रकरणी पारोळा पंचायत समितीला चौकशी करण्याचे आदेश देण्यात आले होते.

### धामणदे येथे भागवत कथेचा समारोप

**मुक्ताईनगर ।** धामणदे येथे सालाबादप्रमाणे यावर्षीही श्री विठ्ठल रुक्माई व पांडुरंग कृपेने श्रीमद् भागवत पुराण कथा व अखंड हरिनाम संकीर्तन सप्ताह दि. ८ ते १४ तारखेपर्यंत कन्हैय्या महाराज देवस्थान ट्रस्ट (नवनाथ मंदिर) येथे दर वर्षी प्रमाणे सुरू आहे. यात प.पु. ह.भ.प. बाळकृष्ण महाराज सरोदे, फुली नांदुरा यांनी कथा वाचन केले. आज दि.१५ रोजी सप्ताहाची सांगता होणार आहे. सप्ताहात हभप दीपक महाराज (निंभोरा सिम), हभप रामेश्वर महाराज (बामणोद), हभप समाधान महाराज (रेभोटा), हभप दीपक महाराज (रेलकर), हभप प्रवीण महाराज (वाघोळा), हभप नारायण महाराज (भामलवाडी), हभप संदीप महाराज (खामणी), हभप विजय महाराज खवले (मोताळा) यांची किर्तने झाली.

# श्रीनरेंद्राचार्य संस्थानचे कार्य कौतुकास्पद : नगराध्यक्ष पाटील

प्रतिनिधी । पारोळा

**रक्तदान हे महादान असून, रक्तदानामुळे अनेकांचे प्राण वाचू शकतात श्री रामानंदाचार्यजी नरेंद्राचार्यजी संस्थानतर्फे आयोजित या रक्तदान शिबिरांमुळे आवश्यक गरजू रुग्णांचे प्राण निश्चितच वाचविण्यास मोठी मदत होईल. संस्थानचे मानवतेची सेवा करण्याचे हे उत्तम कार्य कौतुकास्पद आहे, असे गौरोद्गार लोकनियुक्त नगराध्यक्ष चंद्रकांत पाटील यांनी काढले.**



श्री जगद्गुरु रामानंदाचार्य नरेंद्राचार्यजी यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून आयोजीत येथील कुटीर रुग्णालयात जीवनदान महाकुंभ रक्तदान शिबिराच्या उद्घाटन प्रसंगी ते बोलत होते. यावेळी रक्त साठा, अपघातग्रस्त, शस्त्रक्रिया करणारे रुग्ण, प्रसूतीदरम्यान अडचणीत असलेल्या माता तसेच बॅलेसेमिया, कॅन्सर यांसारख्या गरजू रुग्णांना रक्ताची गरज भासत असते, त्यांचासाठी अशी रक्तदान शिबिरे मोठे योगदान ठरतील असे मत टायगर स्कूल व प्रवक्ता अकॅडमीचे अध्यक्ष रवींद्र पाटील यांनी मनोगतात व्यक्त केले. रक्तदान शिबीरात ३७ दात्यांनी रक्तदान करून सामाजिक बांधिलकी जोपासली. रक्त संकलनात जळगाव जिल्हा सामान्य रुग्णालय व शासकीय महाविद्यालयाचे डॉ. श्रद्धा गोयल, डॉ.अजय गावडे, आदींनी परिश्रम घेतले.

**टायगर स्कूल व प्रवक्ता अकॅडमीचे अध्यक्ष रवींद्र पाटील, सेवा समिती तालुकाध्यक्ष धनराज खैरनार, जिल्हा प्रसिद्धी प्रमुख शिवाजी शेळके, कुटीर रुग्णालय वैद्यकीय अधीक्षक डॉ. जिनेंद्र पाटील, वैद्यकीय अधिकारी डॉ. गिरीश जोशी, डॉ. राजेश वालडे, राम उपरे आदी मान्यवर उपस्थित होते.**

# तामसवाडी येथील द्रोणव सोनार क्रिकेट संघात

प्रतिनिधी । पारोळा


**ग्रामीण भागातील गुणवत्तेला जिद्द आणि मेहनतीची जोड मिळाली की यश नक्कीच मिळते, हे पारोळा तालुक्यातील तामसवाडी येथील द्रोणव सुरेंद्र सोनार याने सिद्ध केले आहे. द्रोणवची नॅशनल क्रिकेट लीग च्या अंडर-१९ संघात निवड झाली असून, यामुळे त्याचे सर्वत्र कौतुक होत आहे. फेब्रुवारी महिन्यात दिल्ली येथे होणाऱ्या मानाच्या एनसीएल ट्रॉफी स्पर्धेत तो आता महाराष्ट्राच्या संघाचे प्रतिनिधित्व करणार आहे.**



निवड शिबिरात द्रोणव सोनार याने अष्टपैलू खेळीचा ठसा उमटविला. गोवा येथे नुकतेच राष्ट्रीय क्रिकेट स्पर्धेचे निवड शिबिर पार पडले. या अत्यंत चुरशीच्या निवड प्रक्रियेत द्रोणवने आपल्या दमदार फलंदाजीने, अचूक गोलंदाजीने आणि चपळ क्षेत्ररक्षणाने निवड समितीचे लक्ष वेधून घेतले.

# पारोळा पालिकेच्या उपनगराध्यक्षपदी रोहन मोरे

प्रतिनिधी । पारोळा



पारोळा शहरात आत्ताच झालेल्या नगरपालिका निवडणुकीचे नवनियुक्त उपनगराध्यक्ष रोहन वसंतराव मोरे तसेच स्वीकृत नगरसेवक पदी राजेंद्र मोतीलाल कासार, मनीष भाईदास पाटील व गोपाल मुरलीधर दाणेज यांची एका मताने निवड झाली असून त्यांचे मनःपूर्वक अभिनंदन माननीय आ. अमोल पाटील तसेच नगराध्यक्ष चंद्रकांत पाटील यांनी केले. तसेच जनसामान्यातून त्यांच्या सर्वत्र कौतुक होत आहे.

## धर्म जागरण संस्थेच्या शबरीधाम पदयात्रेला प्रतिसाद

प्रतिनिधी । पिंपळनेर

धर्म जागरण संस्थेतर्फे शबरीधाम पदयात्रा काढण्यात आली. त्यात जळगाव, भुसावळ, चोपडा, रावेर, साक्री, पिंपळनेर, वळीपाडा, मळगाव, विरखेल, नवापूर, उमरपाटा व डांग जिल्ह्यातील हजारो भाविक या राम आगमन पदयात्रेत सामिल झाले होते. ही पदयात्रा मळगाव येथील राम पादुका मंदिरापासुन, योगी दत्तनाथ महाराज शिंदखेडा व स्वामी आसिमानंद यांच्या नेतृत्वात निघाली.

# हातगाव येथे घरफोडी; सव्वालाखांचा ऐवज लांबविला

प्रतिनिधी । चाळीसगाव

तालुक्यातील हातगाव येथे कुटुंब शेतात गेल्याने घर बंद असल्याचा फायदा घेऊन दिवसाढवळ्या घराचा कडीकुलूप तोडून घरातील कपाटातील रोकडसह सोन्या चांदीचे दागिणे असा सुमारे १ लाख १९ हजार ८०० रूपये किंमतीचा ऐवज चोरून नेल्याची घटना घडली आहे.

याप्रकरणी चाळीसगाव ग्रामीण पोलीस ठाण्यात अज्ञात चोरटध्याच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत सविस्तर माहिती अशी की, हातगाव ता. चाळीसगाव येथील जयबाई गोकुळ आव्हाड ह्या शनिवारी सकाळी ८ वाजेच्या सुमारास मुलीसह गावातील शेतकऱ्याकडे कांदा लागवडीसाठी शेतात गेल्या होत्या, तर मुलगा हा वेहेळगाव ता. नांदगाव येथे शाळेत गेलेला होता. मुलगा दुपारी ११ वाजता शाळेतून घरी आला व जेवण करून घराला कुलूप लावून, शेतात पिकांना पाणी देण्यासाठी गेला.

दुपारी पावणे चारच्या सुमारास मुलगा शेतातून घरी आला असता, त्याला घरातील लोखंडी कपाटाला चावी लावलेली दिसली. मुलाने कपाट उघडून पाहीले, त्यावेळी कपाटाच्या ड्रावरमध्ये ठेवलेले सोन्याचे दागिणे व रोख रकम असा ऐवज दिसून आला नाही. , त्यामुळे कुणीतरी अज्ञात चोरटथाने घराचा दरवाजाचे कुलूप तोडून घरात प्रवेश करून घरातील लोखंडी कपाटात ठेवलेले पैसे व दागिणे चोरट्यांनी चोरून नेल्याचे स्पष्ट झाले. चोरटधांनी १० हजार रूपये किंमतीचे सोन्याचे मंगळसुत्र, ६३ हजार ७०० रूपये किंमतीचा सोन्याचा नेकलेस व कापूस विक्री करून कपाटात ठेवलेले ४६ हजार १०० रूपये असा सुमारे १ लाख १९ हजार ८०० रूपयांचा ऐवज चोरट्यांनी चोरून नेली. याप्रकरणी जयाबाई गोकुळ आव्हाड यांनी दिलेल्या फिर्यादीवरून चाळीसगाव ग्रामीण पोलीस स्टेशनला अज्ञात चोरटबाच्या विरोधात चोरीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास पोलीस करीत आहेत.

# मराठा सेवा संघातर्फे नगरसेवकांचा सन्मान

प्रतिनिधी । चाळीसगाव

मराठा सेवा संघ चाळीसगाव परिवाराच्या वतीने नवनिर्वाचित नगरसेवकांचा सत्कार समारंभ तुकाराम महाराज मंदिर, जय बाबाजी चौक, चाळीसगाव येथे उत्साहात पार पडला. विविध राजकीय पक्षांतून निवडून आलेल्या मराठा समाजातील नगरसेवकांचा या कार्यक्रमात सन्मान करण्यात आला.

याप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून मराठा सेवा संघाचे मार्गदर्शक सुधीर पाटील, प्रदीप देशमुख, रमेश निकम, कुणाल पाटील, प्रा.चंद्रकांत ठाकरे आदी उपस्थित होते. यावेळी नगरसेवक अभिषेक देशमुख, नगरसेविका विजया पवार, नगरसेविका योजना पाटील,



नगरसेविका हर्षदा पवार, नगरसेविका भारती प्रवीण मराठे, नगरसेविका मनीषा पाटील, नगरसेवक राहुल मस्के, नगरसेवक दीपक पाटील, नगरसेविका स्वाती राखुंडे या नवनिर्वाचित सदस्यांचा तसेच मराठा शिलेदार ज्यांनी नगरसेवक निवडणूक मोठ्या जिद्दीने लढली, असे कुणाल पाटील, बंडू पगार, यांचा त्कार करण्यात आला.

# पंचायत राज अभियानांतर्गत महिला उद्योजकता प्रशिक्षण

प्रतिनिधी । पाचोरा

येथील ग्रुप ग्रामपंचायत आसनखेडा बुद्रुक आणि ह्युमन डेव्हलपमेंट फाउंडेशन, पाचोरा यांच्या संयुक्त विद्यमाने मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियान अंतर्गत तीन दिवसीय महिला स्वयंरोजगार प्रशिक्षण व मार्गदर्शन मेळावा उत्साहात पार पडला. या प्रशिक्षणाद्वारे गावातील महिलांना मसाला उद्योग आणि केळी प्रक्रिया उद्योगाचे प्रत्यक्ष धडे देण्यात आले.

कार्यक्रमाचे उद्घाटन सरपंच उषाबाई पाटील यांच्या हस्ते झाले. यावेळी क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले आणि राजमाता जिजाऊ यांच्या



प्रतिमेचे पूजन करण्यात आले. उमेद अभियानाच्या प्रार्थना गीताने कार्यक्रमाची सुरुवात झाली.

कार्यक्रमाचे मुख्य मार्गदर्शक व ह्युमन डेव्हलपमेंट फाउंडेशनचे अध्यक्ष गोकुळ सोनार यांनी महिलांना उद्योजकतेचे महत्त्व पटवून दिले. उमेद अभियानाचे तालुका मॅनेजर सूर्यप्रताप राऊत यांनी बचत गटांमार्फत राबवल्या जाणाऱ्या शासकीय योजनांची माहिती दिली. कुरंगी बांबरुड गण प्रमुख वसंत पाटील यांनी विभागातील बचत गट प्रकल्पांची उदाहरणे देऊन महिलांना प्रोत्साहित केले. प्रशिक्षक रुपाली अमृतकर यांनी मसाला उद्योगाची तांत्रिक माहिती दिली. यामध्ये मिरची, धने, हळद यांची निवड व प्रक्रिया शिकवण्यात आली. महिलांनी प्रत्यक्ष चहा मसाला, गरम मसाला आणि कांदा-लसूण मसाला तयार करण्याचे प्रात्यक्षिक केले.

प्रशिक्षक कृष्णा बोरुडे यांनी केळी वेफर्स, केळीचे पीठ आणि मूल्यवर्धित उत्पादनांची माहिती दिली.

अन्न सुरक्षा व स्वच्छता नियमांचे महत्त्व यावेळी समजावून सांगण्यात आले. दिवस ३ (मार्केटिंग व पॅकेजिंग): प्रशिक्षक प्रशांत साठे यांनी उत्पादनांचे ब्रँडिंग, आकर्षक पॅकेजिंग आणि सोशल मीडिया (व्हॉट्सप, फेसबुक) द्वारे मार्केटिंग करण्याचे तंत्र शिकवले.

# जळगाव ग्रामीण युवासेनेतर्फे युवा नगराध्यक्षा संजना पाटील यांचा सन्मान!

## महाराष्ट्रातील सर्वात कमी वयाच्या युवा नगराध्यक्षा म्हणून मान

प्रतिनिधी । जळगाव

महाराष्ट्रातील सर्वात कमी वयाच्या युवा नगराध्यक्षा म्हणून मान मिळवणाऱ्या मुक्ताईनगर येथील कु. संजना पाटील यांचा जळगाव तालुका युवासेनेतर्फे सन्मान करण्यात आला.यावेळी शिवसेनेचे आमदार चंद्रकांत पाटील उपस्थित होते.

मुक्ताईनगर नगरपंचायतीला नवीन नेतृत्व लाभले असून नवनिर्वाचित लोकनियुक्त युवा नगराध्यक्षा संजना चंद्रकांत पाटील यांनी नुकतेच नगरपंचायतीचा पदभार स्वीकारत नगरकारभाराची धुरा हाती घेतली.



जळगाव जिल्ह्यासह राज्यातील सर्वात कमी वयाचे नगराध्यक्षा बनण्याचा मन संजना पाटील यांनी मिळवला असून याच पार्श्वभूमीवर जळगाव ग्रामीण युवासेनेतर्फे त्यांचा जल्लोषात सन्मान करण्यात आला.

यावेळी युवासेनेचे जळगाव उपतालुका प्रमुख स्वप्निल सोनवणे यांनी समस्त तालुका युवासेनेच्या वतीने संजना पाटील यांचा गौरव करत अभिनंदन केले व युवासेनेच्या वतीने त्यांना भावी वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

संजना पाटील यांची निवड जिल्हाभरातील युवकांसाठी प्रेरणा देणारी असून राजकारणात नवीन असेलेल्या सर्व युवकांना आदर्शवत ठरणारी आहे, असे प्रतिपादन यावेळी सोनवणे यांनी केले.

यावेळी सेनेचे आमदार चंद्रकांत पाटील, जळगाव युवासेनेचे शुभम सोनवणे, राकेश विसपुते यांच्यासह मुक्ताईनगर सेनेचे पदाधिकारी उपस्थित होते.

# संत मुक्ताई पत्रकार संस्थेतर्फे राम रोटी आश्रमात फराळ वाटप

प्रतिनिधी । मुक्ताईनगर

येथे गेल्या १८ वर्षापासून संत - महापुरुषांच्या विचार कार्यावर चालू असलेली मानव सेवा हिच ईश्वर सेवा हि सेवाभावी वृत्ती जोपासलेली गुरुवर्य संत रामभाऊ पुजारी बाबा सेवाभावी ट्रस्ट अंतर्गत रामरोटी आश्रमात एकादशी वारीला संत मुक्ताई पत्रकार संघटनेकडून भाविक, वारकऱ्याना साबुदाणा फराळ वाटप करण्यात आला.

सकाळी १० वाजेपासून जुन्या मुक्ताईमंदिराकडे जाणाऱ्या भाविकांची वर्दळ वाढली. सुरुवातीला रामभाऊ बाबा पुजारी यांच्या प्रतिमेचे पूजन करून फराळ वाटपास सुरवात झाली. दिवसभर शेकडो भाविकांनी साबुदाणा खिचडी फराळाचा लाभ घेतला. याप्रसंगी आश्रमाचे अध्यक्ष बापूसाहेब गावंडे, सचिव रामभाऊ टोंगे, रघुनाथ पाटील, किरण महाजन, माजी सरपंच माळी, ज्येष्ठ पत्रकार मोतीलाल जोगी, मोहन मेढे, पत्रकार संस्थेचे अध्यक्ष अमोल वैद्य, सचिव राजेश पाटील, विनायक वाडेकर, शरद बोदडे, निलेश मेढे, राजेश चौधरी, सचिन झनके, प्रवीण भोई, संदीप जोगी, विठ्ठल धनगर, रवि पवार आदी पत्रकार बांधव, भाविक उपस्थित होते.